पुढारी



आजरा : महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापकांसाठी आयोजित एकदिवसीय प्रशिक्षण शिबिरात बोलताना प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी अशोकअण्णा चराटी, डॉ. अनिल देशपांडे व मान्यवर.

# संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य : डॉ. शिर्के

**आजरा : प्रतिनिधी**

प्रगत माहिती तंत्रामुळे जग जवळ येत चालले आहे. जगातील घटना, कार्यक्रम इंटरनेटच्या माध्यमातून हातातील मोबाईलमध्ये पाहावयास मिळत आहे. माहितीचे अनेक स्रोत उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य दिसत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. येथील आजरा महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या बी. एस्सी. भाग एकच्या संख्याशास्त्र विषयाच्या नवीन अभ्यासक्रमावर आधारित शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापकांसाठी आयोजित एकदिवसीय प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोकअण्णा चराटी होते.

डॉ. किरण पोतदार व प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर यांनी प्रास्ताविक केले. जनता शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. संख्याशास्त्र अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. डी. एन. काशीद, डॉ. ए. ए. कलगोंडा, डॉ. ए. एन. बसुगडे आदी उपस्थित होते.

प्रियांका निटूरकर व मनाली हंडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. व्ही. व्ही. मळेकर यांनी आभार मानले.

लोकमत

# प्रशासकीय कामकाजाचा निपटारा सुलभतेने आवश्यक

## विलास नांदवडेकर : विद्यापीठात कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्रशासनामधील प्रचलित कार्यप्रणालीच्या माध्यमातून कामाचा निपटारा सहज, सुलभतेने व जबाबदारपूर्वक व्हावा, हा उद्देश जोपासून कर्मचाऱ्यांनी योगदान देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम.बी.ए. अधिविभागातर्फे आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून कुलसचिव बोलत होते. यावेळी सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. गणेश मांझा प्रमुख उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या संकल्पनेतून प्रशासकीय सेवक, अधिकारी यांना प्रशासकीय कामकाजाच्या अद्ययावत पद्धतीची माहिती करून देण्यासाठी ही अकादमी स्थापन झालेली आहे. भविष्यात राज्य व राष्ट्रीय पातळीवरील सर्व स्तरांवरील प्रशासकीय सेवक, अधिकाऱ्यांसाठी एक ते चार दिवसांच्या अशा पद्धतीच्या मार्गदर्शनपर कार्यशाळांचे आयोजन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.



यामुळे वेगवेगळ्या आस्थापनांवरील प्रशिक्षित सेवक, अधिकाऱ्यांकडून नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे सुलभ होईल. कार्यालयीन कामकाजामध्ये महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्ट २०१६ अन्वये घ्यावयाच्या निर्णयाची सुरुवात अधीक्षक पातळीपासून होते. त्यामुळे पूर्ण क्षमतेने व जबाबदारीने विविध विषयांवरील टिपणींचे सादरीकरण संबंधित विषयाच्या आनुषंगिक संपूर्ण माहितीसह होणे आवश्यक आहे. अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होण्यासाठी अधीक्षकांनी सदैव दक्ष राहिले पाहिजे. कामकाजात गती येण्यासाठी कार्यालयामधील निरोगी वातावरणाची निर्मिती सुसंवादाने होईल. एम.बी.ए. अधिविभागप्रमुख डॉ. एच. एम. ठकार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विद्यापीठाचे अंतर्गत लेखापाल अजित चौगुले यांच्यासह विद्यापीठातील अधीक्षक, सहायक अधीक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ




कोल्हापूर : 'दि मॅजिक ऑफ व्हर्ब' पुस्तक प्रकाशनप्रसंगी मान्यवर.

# 'दि मॅजिक ऑफ व्हर्ब' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर, ता. ३ :** 'दि मॅजिक ऑफ व्हर्ब' या इंग्रजी क्रियापदांवर आधारित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा केशवराव भोसले नाट्यगृहात शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, माजी इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. जयप्रकाश शिंदे, प्रा. डी. एन. पंगू, कविता सावंत व बीपी प्रकाशनचे प्रकाशक व लेखक प्रा. एम. बी. सावंत यांच्या उपस्थितीत पार पडला.

प्रा. डॉ. जयप्रकाश शिंदे यांनी पुस्तकाबद्दल मनोगत व्यक्त केले. या पुस्तकाचे लेखक प्रा. एम. बी. सावंत यांनी क्रियापदांशी निगडित असलेले वेगवेगळे घटक सर्व स्तरातील इंग्रजी वाचकाला समजेल अशा पद्धतीने यात मांडले आहेत, असे प्रा. डी. एन. पंगू आपल्या मनोगतात म्हणाले.

हे पुस्तक म्हणजे verbs, verbs every where' असेच वाटत असून, प्रा. एम. बी. सावंत यांनी क्रियापदांवर संशोधन करून हा एक प्रबंधच लिहिला आहे. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी इंग्रजी ही जागतिक भाषा बनली आहे. त्यामुळे आजच्या युगात इंग्रजीचे ज्ञान असणे अत्यंत गरजेचे बनलेले असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमप्रसंगी शर्वरी पाटील, शीतल कासार, सुस्मित जाधव, अनेक शाळा व महाविद्यालयांचे शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
04/09/2018 Page No. 7

14 SEP 2018 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांनी बुद्धीच्या कक्षा वाढवाव्यात

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुभाष देसाई यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**आजच्या तरुणांपुढे** रोबोटिक आव्हाने उभी ठाकली आहेत. त्यामुळे तरुणांनी स्वतःला केवळ तंत्रज्ञानापुरते सीमित न करता आपल्या बुद्धीच्या कक्षा वाढविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुभाष देसाई यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे राज्यशास्त्र अधिविभागात आयोजित दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेंतर्गत 'दत्ताबाळांचे जीवन व कार्य' या विषयावर डॉ. देसाई बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. देसाई म्हणाले, जीवनात यशस्वी होण्यासाठी विचारांची पायाभरणी चांगली असली पाहिजे. तरुण पिढीने धर्म आणि विज्ञान या बाबत तौलनिक चर्चा केली पाहिजे. त्याचा त्यांना निश्चितच लाभ होईल. दत्ताबाळ वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांत ते सहभागी होत. निसर्गात, माणसांत ईश्वर पाहण्यास शिका, ही दत्ताबाळांची शिकवण होती.

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, भारतात दोनशे वर्षांपूर्वी १८१८ साली मध्यमवर्गीयांमध्ये आधुनिकता उदयास येण्यास सुरुवात होत होती. त्या वेळेस, मी कोण आहे, असा प्रश्न भारतीयांनी स्वतःला विचारण्यास सुरुवात केली.

त्या पद्धतीने आपण कोणत्याही टोकाला, निष्कर्षाला न जाता नेमकेपणाने दत्ताबाळ यांच्याबद्दल विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. रवींद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले, तर सचिन चव्हाण यांनी आभार मानले.

पुढारी

# 'तंत्रज्ञानापुरते मर्यादित न राहता बुद्धीच्या कक्षा वाढविण्याची गरज'

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** आजच्या स्पर्धेच्या युगातील तरुणांपुढे रोबोटिक आव्हाने उभी ठाकली आहेत. त्यामुळे तरुणांनी केवळ तंत्रज्ञानापुरते सीमित न राहता बुद्धीच्या कक्षा वाढविणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुभाष देसाई यांनी केले. शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभागात आयोजित दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत 'दत्ताबाळांचे जीवन व कार्य' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार होते. डॉ. देसाई म्हणाले, जीवनात यशस्वी होण्यासाठी विचारांची पायाभरणी चांगली असली पाहिजे. तरुण पिढीने धर्म आणि विज्ञान याबाबत तौलनिक चर्चा केली पाहिजे. अध्यक्षीय भाषणात डॉ. पवार यांनी विद्यार्थांनी दत्ताबाळ यांच्याबद्दल अभ्यास करावा, असे आवाहन केले. डॉ. रवींद्र भणगे यांनी प्रास्ताविक केले. सचिन चव्हाण यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागत पालक मेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागत पालक मेळावा झाला. मेळाव्यामुळे पालक-शिक्षक-विद्यार्थी यांच्यामध्ये विचारांची देवाण-घेवाण झाली.

तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी विभागाच्या उपक्रमांबाबत माहिती दिली. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे प्रशासकीय समन्वय डॉ. ए. के. साहू, शैक्षणिक समन्वयक डॉ. पी. डी. पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे प्लेसमेंट सेलप्रमुख डॉ. एस. बी सादळे, सिव्हिल डिपार्टमेंटचे कोऑर्डिनेटर एम. एस. साळुंखे उपस्थित होते. एम. एम. मोरे यांनी आभार मानले.